# प्रकरण तीन

## वित्त विभाग

**3.962 मत्ता व दायित्व विवरणपत्राबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद वित्त विभागाने सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे दिनांक 31/03/2017 रोजी सादर केलेल्या मत्ता व दायित्व विवरणपत्राबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेला मालमत्ता पासून येणे रक्कमा उदा. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेमधील झाडे लिलाव, इमारत थकीत भाडे, भुई भाडे, गाळा भाडे, निवास स्थानके अनुप्राप्ती फी, सेवा कर इत्यादी थकीत येणे रक्कमा मत्तामध्ये दाखविणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 241 नुसार घसारा निधीची रक्कम रुपये 2,50,00,000/- एवढी तरतूद केली असल्याचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आले आहे. परंतु, सदर रक्कम मत्ता / दायित्व विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेली नाही.

3) जिल्हा परिषद, वित्त विभाग, ठाणे सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील गुंतवणूक नोंदवहीनुसार गुंतवणुकीच्या रक्कमेची नोंद मत्ता / दायित्व विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेली नाही.

4) जिल्हा परिषदेच्या मालकीची जंगम व स्थावर मालमत्तेच्या मुल्यांकना एवढी रक्कम मत्ता / दायित्व विवरणपत्रामध्ये मत्ता म्हणून दर्शविणे आवश्यक आहे.

5) लेखापरीक्षणानुसार वसूल झालेल्या परंतु, शासनास भरणा न केलेल्या रक्कमा, प्राप्त शासन अनुदानाची अखर्चित व शासनास परत करावयची रक्कम दायित्वामध्ये नमूद करण्यात आलेली नाही.

6) सामान्य उपकर, वाढीव उपकर आणि मुद्रांक शुल्क अनुदानाची शासन खाती थकबाकी रक्कम मत्तामध्ये नमूद करण्यात आलेली नाही.

मत्तामध्ये नमूद करण्यात आलेली कर्मचारी / खाते प्रमुख आणि गट विकास अधिकारी यांना अदा केलेली अग्रीमाची रक्कम, ग्रामपंचायतीकडून येणे असलेल्या वर्गणी वसूल होणे आवश्यक आहे.

**3.963 घसारा निधीतील त्रुटीबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** घसारा निधीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 या आर्थिक वर्षाच्या मंजुर अर्थसंकल्पान्वये रुपये 2,50,00,000/- इतकी रक्कम घसारा निधीमध्ये जमा करावयाचे अंदाज वर्तविले आहेत. सदर अंदाज अर्थसंकल्पात करतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 241 नुसार तसेच महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक झोडपीए-1080/4768/सीआर-1459/28, दिनांक 01/01/1988 नुसार जिल्हा परिषदेच्या सर्व मत्तांवरील विवरणपत्रात विहीत केलेल्या दराने घसाऱ्याची गणना करुन रक्कम जमा केलेबाबत लेखापरीक्षणास दर्शवावे. जिल्हा परिषदेने त्यांचेकडील पी.आर.बी. नोंदवहीवरील सर्व इमारती व बांधकामे (शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रासहीत) तसेच जिल्हा परिषदेकडील सर्व वाहनावर घसाऱ्यांची गणना करुन अर्थसंकल्पात जमा करावयाची रक्कम काढल्याची कागदपत्रे नस्तीसोबत उपलब्ध झालेली नाहीत.

2) सन 2016-2017 या वित्तीय वर्षाची घसारा निधीची रक्कम दिनांक 31/03/2017 ला घसारा निधी मध्ये जमा करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम घसारानिधीत माहे एप्रिल 2016 ला वर्ग करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे घसारा निधीला मिळणाऱ्या व्याजाचे नुकसान झालेले आहे.

3) जिल्हा परिषदेने पालघर जिल्हा परिषदेस प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 27/06/2016 रोजी रुपये 2,11,82,462/- इतकी रक्कम दिनांक 16/06/2016 च्या आदेशान्वये वर्ग केलेली दिसून येते. सदर आदेशात नमुद

केलेप्रमाणे कमी अधिक घसारा निधीच्या समायोजनाबाबत रक्कम वर्ग करण्यास आयुक्त यांची मान्यता घेतल्याचे पत्र नस्तीत नाही. पालघर जिल्हयास निधी ढोबळ मानाने वर्ग केलेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) दिनांक 31/03/2017 रोजी रोख पुस्तकानुसार रक्कम रुपये 2,28,83,205/- इतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते. तरी इतक्या मोठया प्रमाणात रक्कम बँकेत जमा असुन संपूर्ण वर्षातील जमेची तपासणी केली असता ठेवी अल्प मुदतीत ठेऊन ठेवी वटवून पून्हा लेख्यात जमा केलेल्या दिसून येतात. तरी ठेवीचे नियोजन करणे आवश्यक आहे.

### 3.964 जिल्हा परिषद पालघरची गुंतवणुक आणि खाती ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत उघडणे बाबत

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये जिल्हा परिषदेची खाती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ठाणे मध्ये आहे काय, याबाबत माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 21 दिनांक 22/01/2017 रोजी दिले असता प्राप्त अनुपालनाचे अनुषंगाने जिल्हा परिषद पालघरचे वित्त विभागाचे खाते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ठाणे शाखा पालघरला आहे. त्यासोबत दिलेल्या भारतीय रिजर्व्ह बँकेच्या लायसन्स आणि बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत खालीलाप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारतीय रिजर्व्ह बँक विनियमन अधिनियम 1949 चे कलम 56 (ओ) 22(1) अन्वये प्राप्त शक्तीचा प्रयोग करून ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती शिवाजी पथ, ठाणे यांना LICENCE NO.RPCD(MRO).1262/18/01/038/2011-12 Dated: December 20, 2011 अन्वये बँकिंग कारभार चालु करणे आणि चालु ठेवण्यासाठी लायसन्स प्रदान केलेले असुन पुढील शर्त (क) अन्वये बँकेचे व्यवहारिक कार्य करण्याचे क्षेत्र ठाणे जिल्हयापुरते मर्यादित राहील, असे नमुद केलेले असतांना जिल्हा परिषद पालघरने जिल्हा परिषदेची आणि पंचायत समित्यांची खाती चालु ठेवलेली आहे. त्यामध्ये गुंतवणुक केलेली आहे. त्यामुळे याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

2) कुठल्याही सहकारी बँकेमध्ये असणाऱ्या निधीस फक्त 1 लाखापर्यंत रिजर्व्ह बँकेमार्फत विमा संरक्षण प्राप्त आहे. तथापि, शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सूचनानुसार जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये गुंतवणुक करू शकते. परंतु, ग्रामविकास विभागाने उपरोक्त गुंतवणुक सुरक्षित राहावी, यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीविषयी वेळोवेळी माहिती घेण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने उपरोक्त सादर केलेल्या माहितीच्या आधारे बँकेचा ग्रॉस एन.पी.ए रक्कम रूपये 1,88,857.92 लक्ष आहे. जो बराच जास्त आहे. बँक आर्थिक दिवाळखोरीत निघाल्यास जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान होईल. याबाबत जिल्हा परिषद पालघरने तात्काळ धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

### 3.965 जिल्हा परिषदेमार्फत केल्या जाणाऱ्या अंतर्गत लेखापरिक्षणाबाबत

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंतर्गत लेखापरीक्षण शाखेकडून करण्यात येणारे लेखापरीक्षणाबाबतची माहिती पाहता जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागांचे लेखापरीक्षण होत नसल्याचे दिसून येते. सदर बाब गंभीर स्वरुपाची असून यामुळे भविष्यात वित्तीय अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक लेखाप-2015/प्र.क्र.42/वित्त-6, दिनांक 05/12/2015 नुसार प्रभाविपणे अंतर्गत लेखापरीक्षण पथकाने काम करणे आवश्यक आहे. तसेच अंतर्गत लेखापरीक्षणाचे वार्षिक वेळापत्रक अंतिम करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. तसेच परीच्छेद 08 नुसार अंतर्गत लेखापरीक्षकांने काढलेले आक्षेपांचे अनुपालन 06 आठवडयात सादर करणे आवश्यक असल्याची तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाचे लेखापरीक्षणापूर्वी अंतर्गत लेखापरीक्षण करणेची तरतूद आहे. मात्र तशी कार्यवाही होतांना दिसून येत नाही.

**3.966 संकिर्ण जमा व अनामतीबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** संकिर्ण जमा व अनामती नमुना नंबर 71 नोंदवहीची तपासणी केली असता त्यामध्ये अनामती जमा केलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर रजिस्टरमध्ये सन 2016-2017 मध्ये महिनानिहाय व वर्षनिहाय गोषवारा काढलेला नाही. तसेच लेखाशिर्षनिहाय गोषवारा काढलेला नाही. सन 2016-2017 मध्ये एकूण किती संकिर्ण अनामती कोणत्या लेखाशीर्षाखालली जमा झाल्या, किती परत केल्या व किती संकिर्ण अनामती शिल्लक राहिल्या, याची पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 217 नुसार ठेवींचा परतावा नमुना नंबर 83 मधील व्हाऊचरमध्ये करणे आवश्यक आहे. तो केलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 216 नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी मिळालेल्या संकिर्ण जमा व अनामतीच्या लेखाशीर्षानुसार व पाननिहाय रक्कमा दर्शविणे आवश्यक आहे. तसे केलेले नाही.

4) वित्त विभागाकडील नमुना 71 सुरक्षा अनामत नोंदवही ही वर्षनिहाय व विभागवार लेखाशीर्षानुसार ठेवलेली नाही. त्यामुळे तीन वर्षावरील ठेवी व्यपगत करणेबाबतची पडताळणी करता आली नाही. संपूर्ण नोंदवहयांचा पूर्वलक्षी प्रभावाने आढावा घेऊन जिल्हा परिषद निधी सदरी जमा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दिनांक 31/03/2017 अखेर नोंदवहया अदयावत ठेऊन लेखापरिक्षणास पूर्तता अनुपालन सादर करावे.

**3.967 व्यपगत केलेल्या अनामती भरणा केलेल्या चलनाबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 या वित्तीय वर्षात विभागाने अनामती सन 2012-2013, 2013-2014 पर्यंत व्यपगत करून त्या त्या खाती भरणा करून त्याची चलनासहित दप्तरी ठेवणे गरजेचे आहे.

1) खाते क्रमांक 34 सन 2012-2013 रक्कम रुपये 1,04,95,223/- चे चलन नाही.

2) संकिर्ण अनामती खाते क्रमांक 34 सन 2012-2013 रक्कम रुपये 13,91,433/- चे चलन नाही.

3) संकिर्ण खाते क्रमांक 300 हस्तांतरित योजना रक्कम रुपये 1,05,20,991/- चे चलन आहे.

4) मुख्य लेखा वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी यादीवर आढळून येत नाही.

5) सन 2013-2014 वर्षाच्या अनामती रक्कम किती, याची बेरीज केलेली नाही. तसेच ती बेरीज करून साक्षांकित करून घ्यावी. ती रक्कम व्यपगत करणे 1968 चे नियम 219 नुसार कमःप्राप्त आहे. परंतु, दिनांक 31/03/2017 पर्यंत व्यपगत केलेले नसल्याने जिल्हा परिषदेचे नुकसान झालेले आहे. हे नाकारता येत नाही.

6) मक्तेदार अनामतीच्या नोंदी नमुना नंबर 71 वर घेण्यात आलेल्या आहेत. तसेच चलनानुसार नमुना नंबर 13 मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. परंतु, नमुना नंबर 13 व नमुना नंबर 71 यामधील रकमांचा मेळ दिलेल्या विवरण पत्र क्रमांक 6 बरोबर वर्षनिहाय जुळत नाही. शिवाय नमुना नंबर 71 यांच्या बेरजा पक्क्या केलेल्या नाहीत. तरी वरील सर्व पुर्तता करून रकमांचा मेळ घेवून पुर्तता दाखवावी

**3.968 आयकर अधिनियमानुसार देय वेतनातून दरमहा आयकर कपात न केलेबाबत**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** वित्त विभाग] जिल्हा परिषद मधील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील वेतन देयकांच्या तपासणीत आयकराची रक्कम फेब्रुवारी 2017 देय मार्च 2017 या महिन्याच्या वेतन देयकातून संपूर्ण वित्तीय वर्षासाठी कपात केलेली आढळून आली आयकर अधिनियमाचे कलम 192 नुसार त्या संपूर्ण करनिर्धारण वर्षासाठी देय होणाऱ्या एकूण आयकराची रक्कम परिगणीत करुन, रुपये 5,000/- पेक्षा जास्त आयकराची रक्कम येत असल्यास, त्या बाबतीत वित्तीय वर्षातील सुरुवातीच्या वेतन देयकापासून (उदा. मार्च 2016 देय एप्रिल 2017) सुरुवात करून त्या वित्तीय वर्षातील पुढील सर्व वेतन देयकांमधून योग्य त्या (व्हरेज

बेसीस) प्रमाणात कपात करणे बंधनकारक आहे. मात्र वित्त विभाग, जिल्हा परिषद, नाशिक येथे अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. अशा प्रकारे टीडीएस नियमानुसार आयकर कपात करणे हे आहरण व संवितरण अधिकारी यांचे कर्तव्य आहे. अशा प्रकारे नियमानुसार आवश्यक असलेली कार्यवाही न केल्यामुळे आयकर विभागाकडून कलम 201(1) नुसार व्याज आकारणीची दंडात्मक कार्यवाही केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नियमानुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**3.969 भांडार विभागाकडील प्रलंबित रकमांच्या देयकाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, नाशिक चे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे भांडार विभागाचे लेखापरीक्षण केले असता पंचायत समिती व जिल्हा परिषद अंतर्गत विभाग यांना मागणीनुसार उधारीने लेखन साहित्य पुरविलेले आहे तथापि, दिनांक 31/03/2017 अखेर पंचायत समितीकडे रुपये 5,40,436/- व जिल्हा परिषदेकडे रुपये 6,81,484/- असे एकूण 12,21,920/- रूपये प्रलंबित असल्याचे दिसून आले. याबाबत तपशिल सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रं 4 मध्ये दिला आहे. तरी प्रलंबित रकमा सत्वर वसुल करून अनुपालन दर्शवावे

**3.970 धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गुंतून पडलेल्या शासकीय अनुदानची रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद, धुळे यांचे निधीच्या रकमा धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धुळे यांचेकडील बँकखाती रक्कम सन 2012-2013 पासून दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रुपये 13,69,80,444.59 एवढी मोठया स्वरुपाची रक्कम गुंतून पडलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील नियम 03 चे परिशिष्ट 01 नुसार जिल्हा परिषदेच्या आर्थिक व्यवहाराचे कर्तव्य व जबाबदारीचे निकष नमूद करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 नियम 277 नुसार शासकीय अनुदान प्रयोजनाशिवाय बँकेत ठेवता नाही. धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धुळे यांचे खाती हस्तातरण व अभिकरण निधीचे रक्कम रुपये 8,74,79,438/- इतकी रक्कम सन 2012-2013 पासून गुंतून पडलेली आहे. सदरच्या रक्कम बँकेकडून प्राप्त करुन घेण्याची ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) शासकीय निधी ज्या प्रयोजनासाठी दिलेला आहे, त्याचा विनियोग विहित मुदतीत करण्याबाबत वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोप्राय, दिनांक 06/06/2008 नुसार ज्या वर्षात रक्कम प्राप्त झालेल्या आहेत, त्या वर्षात किंवा पुढील वर्षात असे दोन वर्षाच्या कालावधीसाठी खर्च करण्याबाबत तरतूद विशद केलेली आहे. दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीची रक्कम शासनाच्या मान्यतेशिवाय खर्च करता येणार नाही, असे स्पष्ट आदेश असतांना उपरोक्त नमूद केलेल्या रकमा ज्या प्रयोजनासाठी प्रदान करण्यात आलेल्या आहेत, ते प्रयोजनाचा उदिष्ट अशा अनावश्यक रक्कम गुंतून पडल्यामुळे सफल झालेले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1961 चे कलम 141 ए व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.522/वित्त-9, दिनांक 10/12/2010 नुसार शासकीय अनुदानाच्या रकमा वसुलीबाबत सुचना क्रमांक 6 नुसार संबंधिताच्या मालमत्तेतून महसूल विभागामार्फत म्हणजे आर.आर.सी.अन्वये कार्यवाहीची तरतूद विशद केलेली असतांना तसेच लेखासंहितेतील तरतुदींचे पालन झालेले नाही. सदरच्या अनावश्यक गुंतून पडलेल्या रकमेबाबत वेळोवेळी सन 2014-2015 तसेच सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात आक्षेप घेण्यात येवूनही जिल्हा परिषदेने शासन स्तरावरुन कार्यवाही करणे उचित असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

उक्त रकमेची वसुली करण्यात येवून सदरचा अखर्चित निधी सत्वर शासन सदरी भरणा केल्याबाबत अनुपालन दर्शवावे व शासन सदरी भरणा करावी.

**3.971 धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जिल्हा परिषद, नंदुरबार जिल्हा निधीचे खाते बंद करुन ते राष्ट्रीय बँकेत उघडणेबाबत**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पिका 2012/प्रक.80/वित्त-3, दिनांक 08/08/2012 अन्वये धुळे व नंदुरबार मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केल्याने व त्यास बँक परवाना नुतनीकरण अदयाप मिळालेले नसल्याने धुळे व नंदुरबार मध्यवर्ती सहकारी बँकेतील जिल्हा परिषदेची खाती बंद करुन राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु, दिनांक 31/03/2017 अखेर जिल्हा परिषदेमधील रक्कम रुपये 75,73,47,878.96 बँकेत गुंतलेली आहे व त्यात शासनाचे अनुदान रकमेचा समावेश आहे. तरी मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करुन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक अआर2013/प्रक्र.-3/वित्त-2 दिनांक 04/02/2014 अन्व्ये जिल्हा परिषदेकडील (वेतन व वेतनेतर) अखर्चित निधी शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**3.972 जिल्हा परिषद स्वउत्पन्नाचे अंदाजपत्रकात मागासवर्गीय / महिला व बालकल्याण / अपंगांसाठी अनुशेषाप्रमाणे तरतूद न करता कमी तरतूद व कमी खर्च केलेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा निधीचे सन 2016-2017 च्या अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता स्वउत्पन्नातून करावयाच्या तरतूदी पेक्षा कमी तरतूद व कमी खर्च केलेला आढळून आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/सीआर1265/34, दिनांक 09/12/1993 अन्वये उत्पन्नाचे 20 टक्के निधीची अर्थसंकल्पीय तरतुद मागासवर्गीयांसाठी करणे आवश्यक आहे. परंतु, वित्त विभागाने रुपये 4,09,12,200/- तरतूद करणे आवश्यक असतानां रुपये 1,99,38,000/- तरतूद केलेली आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी10/2001/प्रक्र206/5, दिनांक 06/11/2001 अन्वये उत्पन्नाचे 10 टक्के निधीची अर्थसंकल्पीय तरतुद महिला व बालकल्याणसाठी करणे आवश्यक आहे. परंतु, वित्त विभागाने रुपये 2,84,22,600/- तरतूद करणे आवश्यक असतानां रुपये 87,66,000/- तरतूद केलेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/ प्रं.क्रं.4871/ वित्तं-3, दिनांक 25/06/2014 अन्वंये पंचायत समितींनी त्यांच्या स्वनिधीमधुन अपंगांच्या कल्याण व पुर्नवसनारिता3 टक्के निधीची अर्थसंकल्पीय तरतुद करणे आवश्यक आहे. परंतु, वित्त विभागाने रुपये 1,59,00,650/- तरतूद करणे आवश्यक असतानां रुपये 70,93,000/- तरतूद केलेली आहे.

4) तसेच आर्थिक वर्षात केलेल्या तरतूदीची रक्कम खर्च न झाल्यास उर्वरित रक्कम अनुशेष म्हणून पुढील वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. जिल्हा परिषदच्या सन 2016-2017 च्या सुधारित अंदाजपत्रकात याप्रमाणे तरतुदी केलेल्या नाहीत. तसेच वार्षीक जमा-खर्चानूसार इतर लेखाशीर्षाच्या केलेल्या तरतूदीपेक्षा कमी खर्च करण्यात आलेला आहे.

5) नमूद अनुषेशाच्या रकमा हया सन 2010-2011 पासून च्या असून दरवर्षी अनुशेषाची रक्कम वाढत आहे. सदर बाब गंभीर स्वरुपाची आहे.

6) उपरोक्तप्रमाणे केलेली तरतूदही अनुशेषापेक्षा कमी केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/वर्ग -3/प्र.क्र./1443/27, दिनांक 20/09/2003 अन्वये उपलब्ध निधीचा नियोजनपुर्वक पुरेपुर विनियोग करुन ग्रामीण जनतेस उपकर निधीचा जास्तीत जास्त लाभ करुन देता येईल, या दृष्टीने योग्य ते अंदाजपत्रक तयार करुन त्याप्रमाणे खर्च करणे आवश्यक असतांना नियोजनाअभावी तरतुद कमी झालेली आहे. तरी सदरबाबत संयुक्तिक खुलासा सादर करण्यात यावा.

**3.973 सुरक्षा अनामत रक्कम तफावती बाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

वित्त विभागाकडील सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात अनामतबाबत मागील लेखापरीक्षण सन 2015-2016 च्या अहवालानुसार परिच्छेद क्रमांक 17 मध्ये दिनांक 31/03/2016 अखेर सुरक्षा अनामत रक्कम रुपये 7,63,62,238/- दर्शविली आहे. परंतु, सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणास सादर केलेल्या विवरणामध्ये सुरुवातीची शिल्लक रुपये 7,77,61,041/- दर्शविली आहे. रुपये 13,98,803/- ने सुरक्षा अनामत जादा दर्शविली आहे.

**3.974 घसारा निधी वर्गणीबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** लेखापरिक्षणात वित्त विभागाकडील घसारा निधीचे तपासणी केली असता सदर निधीत रक्कम रुपये 40,00,000/- वर्गणी जमा केलेबाबत नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) घसारा रक्कम निश्चित करतांना पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

1. मालमत्तेची मुळ किंमत.
2. मालमत्ता कार्यरत असल्याचे अंदाजित आयुर्मान
3. दुरुस्ती व नुतनीकरणासाठी केलेला खर्च
4. मालमत्तेची मोडीची (Break-up किंवा residual) किंमत.

वरीलप्रमाणे बांधकाम व सामान्य प्रशासन विभागाने आपल्या मालमत्तेवरील दुरुस्ती/ नुतनीकरणावरील खर्चाचा घसारा रक्कम निश्चित करताना विचार न केल्याने घसारा वर्गणीचा भरणा करण्यात आला आहे. तरी मालमत्तेच्या सुरुवातीपासून या बाबींचा विचार करुन नियमाप्रमाणे घसारा वर्गणीची रक्कम परिगणीत करुन जिल्हा परिषद घसारा निधीत भरणा करण्यात यावी.

2) जिल्हा परिषदेने पुढीलप्रमाणे मालमत्तेवर दुरुस्ती, नविन बांधकाम यासाठी खर्च केला आहे. सदर रकमेत वरील वर्गणी भरणा समावेश नसल्याचे दिसून आले. तरी याप्रमाणे सर्व बाबीवरील खर्चाची माहिती घेऊन एकूण वर्गणी भरणा केल्याबाबत अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 नियम 415 प्रमाणे (विशिष्ट बाबींचे दर पुढे नमूद केलेले आहेत.) घसारा दराप्रमाणे प्रथमपासूनच्या रकमेची गणना करुन ती रक्कम निधीत जमा करुन अनुपालन दर्शवावे.

(सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेप्रमाणे घसारा दर-)

| | | |
|---|---|---|
| 1. | संयत्र व यंत्रसामुग्री | यंत्राचे प्रकारानुसार 10 ते 20 टक्के |
| 2. | हत्यारे | 20 टक्के |
| 3. | फर्निचर | 6 टक्के |
| 4. | वाहने | 15 टक्के |
| 5. | विद्युत मोटारी व पंखे | 5 टक्के |

**3.975 नियमबाहयरित्या मंजूर केलेल्या खाते तसलमातीबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 210 अन्वये (अ) स्थायी अग्रिम व (ब) इतर अग्रिम याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. इतर अग्रिमाबाबत विभाग प्रमुख तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये 1,000/- पर्यंत अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार प्रदान असताना रुपये 1,000/- पेक्षा जास्त रकमेचे अग्रिम मंजूर झालेले आहे. तसेच सदर रकमा ह्या सन 2001 पासून प्रलंबित असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 220 नुसार तसेच मुंबई वित्तीय नियम

1959 मधील नियम क्रमांक 142 व 143 नुसार आगावु रकमा वेळीच वसुल होणे आवश्यक असताना, जिल्हा परिषदेकडील जुन्या खाते तसलमात रकमांचे दिनांक 31/03/2017 अखेर समायोजन करण्यात आलेले नाही.

2) अदा करण्यात आलेले अग्रिमाचा तपशिल नमुना नंबर 79 मध्ये नमुद नसल्याने अग्रिम शासकीय कामासाठीच देण्यात आले, याबाबत खात्री होत नाही. तसेच उपरोक्त अनुक्रमांक 2 अन्वये श्री. खंडागळे यांनी अपहार केलेल्या रकमेवरील व्याजापोटी अग्रिम अदा करण्यात आलेले आहे. सदर अग्रिम कोणत्या नियमान्वये मंजूर करण्यात आले? तसेच अग्रिम वसुलीबाबतची कार्यवाही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. अनुक्रमांक 1 आणि अनुक्रमांक 2 ही अग्रीमे सन 2001 पासून थकीत असल्याचे दिसुन येते. सदर अग्रिमाच्या वसुली अभावी जिल्हा परिषदेची रक्कम नाहक गुंतुन राहिलेली रक्कम व्याजासह वसुल करुन जिल्हा परिषद निधीत जमा होणे आवश्यक आहे.

### 3.976 अखर्चित रकमा शासनास भरणा करणेबाबत.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** जिल्हा परिषद, सातारा वित्त विभागाचे लेखापरीक्षणामध्ये सन 2016-2017 चे वार्षिक लेखेनुसार वर्षाच्या सुरवातीची शिल्लक, वर्षामध्ये प्राप्त निधी, झालेला खर्च व वर्ष अखेरीस अखर्चित निधीचे लेखापरीक्षण केले असता लेखाशिर्षनिहाय रक्कम रूपये 16,02,16,733/- वर्ष अखेरीस शिल्लक असल्याचे दिसते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय दिनांक 26/09/2005 मधील अट क्रमांक 9"ब" नुसार मागील वर्षी अखर्चीत निधी खर्च करणेस दिनांक 30 जून पूर्वी वित्त विभागाची अनुमती घेण्याबाबत आदेश होते. तथापि, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 अनुसार त्यामध्ये सुधारणा करणेत आली असून त्यानुसार सदरचा निधी पुढील आर्थिक वर्षाअखेरपर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात आली आहे. तथापि, जिल्हा परिषदेकडील 16,02,16,733/- एवढा निधी सन 2016-2017 वर्ष अखेरीस शिल्लक असल्याचे दिसते. याबाबत अनुषांगिक नोंदींसह मेळ घेऊन त्यानुसार अंतिमत: अखर्चित राहणारी रक्कम लेखाशिर्षनिहाय शासन खाती भरणा केल्याची चलनाद्वारे खात्री पटवावी अन्यथा शासन निर्णयाप्रमाणे सदर रक्कम शासन खाती भरणा करावी.

### 3.977 बांधकामाच्या कामातील विविध शासकीय कपातीच्या रकमा विहित मुदतीत न भरल्याने झालेल्या अनियमिततेबाबत

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** वित्त विभाग सन 2016-2017 चे लेखापरीक्षणामध्ये हस्तांतरण निधी, अभीकरण, स्वीय निधीचे रोकड नोंदवही बँक ताळमेळ घेतला असता बांधकामाच्या कामातील विविध शासकीय कपातीच्या रकमा विहित मुदतीत न भरल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 च्या कलम 40 नुसार ज्या महिन्यामध्ये आयकराची कपात करण्यात आली आहे, त्या महिन्यापासून एक आठवड्याच्या आत सदर कपात रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

2) बांधकाम कामाच्या विम्याची रक्कम बांधकाम सुरु करण्यापूर्वी भरणा करणे आवश्यक आहे तशी कार्यवाही केलेली नाही.

3) मुंबई विक्रीकर अधिनियम 1959 च्या कलम 40 नुसार ज्या महिन्यामध्ये रक्कम कपात केली आहे, त्या महिन्याच्या पुढील 21 तारखेपर्यंत भरणा करणे आवश्यक आहे.

4) रॉयल्टी विहित मुदतीत भरणा केलेली नाही.

**3.978 क्रिडा स्पर्धा सन 2017 करीता खरेदी केलेल्या साहित्य व अनुषंगीक सर्व खरदी / क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या स्पर्धकांकरीता भोजन इत्यादी खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** क्रिडा स्पर्धा सन 2017 करीता खरेदी केलेल्या साहित्य व अनुषंगीक सर्व खरदी / क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या स्पर्धकांकरीता भोजन इत्यादी खर्चाकरिता रक्कम रूपये 3,42,601/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील नियम क्रमांक 100 नुसार जिल्हा परीषदेने करावयाच्या कामाची यादी अनुसूची 1 मध्ये देणेत आली असून सदर यादीमध्ये जिल्हा परिषदेने अधिकारी/कर्मचारी क्रिडास्पर्धा घेणेबाबतची कोणतेही निर्देश नाहीत. सबब सदर स्पर्धा घेणेकरीता झालेला खर्च अनुज्ञेय ठरत नसल्याने झालेला खर्च रक्कम रुपये 3,42,601/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

**3.979 राजश्री शाहु छत्रपती विदयानिकेतन जिल्हा परीषद निवासी क्रिडा प्रशालेच्या खात्यावरील व्याज रक्कमेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत पंचायत समिती अधिनियमाचे कलम 100 खालील अनुसूची 1 मधील अनुक्रमांक 28 इतर शैक्षणीक बाबीखाली तरतुदीनुसार राजश्री शाहु छत्रपती विदयानिकेतन, जिल्हा परीषद निवासी क्रिडा प्रशाला सुरु करणे हा नावीन्यपुर्ण उपक्रम हाती घेणेस व प्रशालेचा दैनिक, प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च भागविणेसाठी जिल्हा परीषद स्वनिधीतुन गुंतवणुक करुन येणाऱ्या व्याज रक्कमेतुन प्रदान करणेस मंजूरी दिली आहे. वित्त विभागाने दिनांक 21/06/2014 रोजी रक्कम 15 कोटी 5 वर्षासाठी 9.60 व्याज दराने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह बँकेमध्ये गुंतवणुक केली आहे. सन 2016-2017 मध्ये सदर गुंतवणुक रक्कमेवर प्राप्त होणारी व्याजाची रक्कम RTGS प्रणालीद्वारा कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून वर्ग करण्यात आली आहे

सदर व्याज रक्कम राजश्री शाहु छत्रपती विदयानिकेतन जिल्हा परीषद निवासी क्रिडा प्रशालेच्या मागणीनुसार देणे आवश्यक असतांना तसे न करता परस्पर उपरोक्तप्रमाणे प्रती तिमाहीस व्याजाची रक्कम वर्ग केली आहे.

2) विदयानिकेतन यांनी प्रतीवर्षी त्यांच्या येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक जिल्हा परीषदेस सादर करुन ते जिल्हा परीषदेमार्फत पंचायत समितीकडून मंजूर करुन घेणे आवश्यकता असतांना तशी कार्यवाही होत नसल्याने व सदरच्या रक्कमेचा अंतर्भाव जिल्हा परीषदेच्या वार्षिक लेख्यामध्ये केला जात नाही.

3) प्रतीवर्षी विदया निकेतन स्तरावर जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेचा विनीयोग केल्या अंती शिल्लक निधी हा जिल्हा परीषद निधीमध्ये परत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आज अखेरच्या अखर्चित व्याज रक्कम व केलेल्या खर्चाचा हिशेब सादर करणे आवश्यक व त्याप्रमाणे वित्त विभागास विनियोग दाखला सादर करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) राजश्री शाहु छत्रपती विदयानिकेतन जिल्हा परीषद निवासी क्रिडा प्रशाला सुरु करणे व त्याचा खर्च उपरोक्तप्रमाणे जिल्हा परीषद स्वनिधीतून केलेल्या गुंतवणुक रक्कमेच्या प्राप्त होणाऱ्या व्याजातून भागवणे या उपक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, कोल्हापूर यांनी पत्र क्रमांक कोपि/शिक्षण/ प्राथमीक/वशी-18/ प्रस्ताव / 2014, दिनांक 06/08/2014 अन्वये ग्रामविकास विभागास प्रस्ताव सादर केला असुन त्यास अदयाप शासनाची मंजुरी मिळालेली नाही. मंजुरी शिवाय केलेला खर्च नियमबाहय आहे.

**3.980 13 वा वित्त आयोगाचा अखर्चीत निधी शासनास परत न करता 11- संकीर्ण मध्ये जमा करण्याबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, अमरावतीच्या सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात 13 वा वित्त आयोग सेंट्रल बँक खाते क्रमांक 3086605267 च्या रोख पुस्तकाची तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक 01 दिनांक 05/04/2016 नुसार रक्कम रूपये 69,33,300/- शिक्षण विभागाकडील बॉयोमेट्रीकल अटेंडन्स मशीन खरेदी रक्कम जिल्हा परिषद सेस खाती

वळती करण्यात आले आहे. सदची रक्कम लेख्यात 11- संकीर्ण मध्ये लेखाशिर्षाखाली जमा दाखविण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मे. झेनीथ कंन्ट्रोल अँन्ड सिस्टीम, बेंगलोर यांनी धारणी तालुक्यात बॉयामेट्रीक अटेन्डन्स मशीन उशीरा पुरविठा केला असुन बँक गॅरंटीची मुदतवाढ करुन देण्यास नकार दिल्याने तसेच करारनाम्यातील अट क्रमांक 6 व 7 चा भंग झाल्यामुळे सदर कंपनीचा करार रदद् करण्याबाबत तसेच पुरविण्यात आलेल्या मशीन परत घेवुन देण्यात आलेली रक्कम परत करण्याकरीता कळविण्याबाबत सहसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती पत्र क्रमांक जि.प/शिक्षण/भांडार/570/2016, दिनांक 11/01/2016 अन्वये विनंती करण्यात आली आहे. त्यानुसार सदर कंपनी सोबतचा बॉयोमेट्रीक अटेन्डन्स मशीनच्या खरेदीचा करारनामा रदद् करण्याबाबत जिल्हा परिषेदेने सर्वसाधरण सभेने ठराव घेतले असुन त्यानुसार कार्यवाही चालु असल्यामुळे संबंधीत कंपनीचे करारनाम्यानुसार उर्वरीत रक्कम रूपये 69,33,300/- देय नसतांना 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन आहरीत करुन 11- संकीर्ण ठेवीमध्ये ठेवण्यात आली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 79 नुसार कोणत्याही पुरवठादारास रक्कम देय होत असल्याखेरीज रक्कम आहारीत न करण्याबाबत निर्देश असतांना 13 वा वित्त आयोगाचा निधीची मुदत संपल्यामुळे सदरचा निधी परत जावु नये, याकरीता सदरची रक्कम 13 वा वित्त आयोग निधीतुन आहरीत करुन 11- संकीर्ण खाती वळती करण्यात आला आहे. सदर बाब नियमबाहय आहे.

**3.981 खाते प्रमुखाकडे असलेल्या प्रलंबीत अग्रीमाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** खाते प्रमुखाकडे असलेल्या प्रलंबीत अग्रीमाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

एकुण प्रलंबीत अग्रीम रुपये 1,72,41,034/- असुन यापैकी बांधकाम विभाग व लघुसिचंन विभागास देण्यात आलेले अग्रीम रुपये 1,46,91,368/- आहे म्हणजेच प्रलंबीत अग्रीमाचे तुलनेत एकुण 9 विभागांपैकी 2 विभागाकडे प्रलंबीत अग्रीमाची रक्कम ही 85 टक्के प्रलंबीत आहे व उर्वरीत 7 विभागाकडील प्रलंबीत अग्रीम प्रमाण हे 15 टक्के आहे. बांधकाम तथा लघुसिचंन विभागकडील प्रलंबीत अग्रीमाबाबत माहिती घेतली असता सदर विभागाकडील अग्रीम हा न्यायालयीन डिक्री प्रकरणी देण्यात आलेले असल्याने न्यायालयाचे निकाला अभावी प्रलंबीत असल्याचे सांगण्यात आले. तसेच सबंधीत खाते प्रमुख यांचेसोबत प्रकरण तात्काळ निकाली काढण्याचे दृष्टीने वित्त विभागाकडुन पत्रव्यवहार सुरु असल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकरणी विशेष लक्ष पुरवुन या दोन खात्याकडील प्रलंबीत रक्कमा निकाली काढण्याबाबत विशेष प्राधान्य देण्यात यावे.

शिक्षण विभाग, माध्यमिक तथा आरोग्य विभाग, यांचेकडील प्रलंबीत अग्रीमाची रक्कम रुपये 1,79,557/- असुन ही रक्कम सुध्दा न्यायालयीन डिक्री प्रकरणी देण्यात आलेले असल्याने न्यायालयाचे निकाला अभावी प्रलंबीत असल्याचे सांगण्यात आले. तसेच सबंधीत खाते प्रमुख यांचेसोबत प्रकरणी तात्काळ निकाली काढण्याचे दृष्टीने वित्त विभागाकडुन पत्रव्यवहार सुरु असल्याचे सांगण्यात आले.

समाजकल्याण विभागास सन 2012-2013 मध्ये रुपये 14,12,750/- निधी जिल्हा परिषद उपकर योजनेअंर्तगत मागास वर्गीय लाभार्थींना कुकुट पालन व्यवसाय करणेकरीता पक्षी पुरविणेबाबत अग्रीम दिलेले आहे. सदर अग्रीमाबाबत वित्त विभागाकडुन विचारणा होत असुन समाजकल्याण अधिकारी, अकोला यांचे पत्र क्रंमाक 48 दिनांक 15/01/2016 अन्वये प्रलंबीत अग्रीमाचे समायोजन करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे लेखी नमूद करुन दिले आहे. परंतु, अदयाप पावेतो या सबंधी कोणतीच कार्यवाही नाही.

लेखा संहिता 1968 चे नियम 210 ब नुसार पुर्वीच्या अग्रीमाचे समायोजन झाले नसल्यास दुसयांदा अग्रीम मंजुर करु नये, अशी नियमात तरतुद असतांना काही प्रमाणात अग्रीम मंजुर केल्याचे दिसुन येत आहे

लेखासंहिता 1968 चे नियम 220 नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी थकीत रक्कमांचे समायोजन वेळीच करण्यात आले किंवा नाही, याबाबत पडताळणी करणे आवश्यक आहे व सदरची कार्यवाही वित्त विभागाने केलेली आहे. वित्तीय वर्षाचे शेवटी एक वर्षापेक्षा जुन्या व प्रलंबीत असलेल्ल्या रक्कमांच्या बाबी व त्या प्रलंबीत

राहण्याची कारणे दर्शविणारे विवरण लेखापरीक्षा विभागास तसेच नियम 221 नुसार प्रलंबीत रक्कमांचे विवरण पत्र लेखापरीक्षा विभागास पाठविणे आवश्यक आहे. परंतु, सदरची कार्यवाही दिसुन येत नाही.

लेखासंहिता 1968 चे नियम 213 नुसार अग्रीम नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक असतांना नोंदवहीमध्ये मासिक गोषवारे काढलेले नाहीत. वरील नमुद केल्याप्रमाणे प्रलंबीत अग्रीम निकाली काढण्याबाबत ठोस कार्यवाही करुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**3.982 13 वा वित्त आयोगाचे व्याजाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्राम विकास व जल संधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिपनी-2009/प्र.क्र.5019/वित्त-3, दिनांक 10/06/2009 अन्वये हस्तांतरीत व अभिकरण तत्वावरील योजनेसाठी व विकास प्रयोजनासाठी प्रशासकीय विभागाकडून जिल्हा परिषदांना अर्थसंकल्पीय तरतूदीचे आधारे वितरण पध्दतीव्दारे अनुदान देण्यात येतात. अशा माध्यमातून जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यात येणा-या अभिकरण व हस्तातरण योजनेचा निधीच्या शिल्लक रककमेचा विनियोग तातडीने करावा लागणार नसेल, तर काही रककमा तात्पूरत्या कालावधीकरिता जिल्हा मध्यवर्ती बँक व जिल्हा परीषदेचे आर्थिक व्यवहार ज्या बँकामधून चालतात अशा बँकामध्ये ठेवण्याबाबत शासनाचे आदेश आहे. परंतु, 13 वा वित्त आयोगातील प्राप्त अनुदानाच्या रक्कमा बॅकेत MOD मध्ये रुपांतरीत करण्यात आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 05 दिनांक 31/01/2018 नुसार संबधीत आदेशाची प्रत मागणी केली असता, उपलब्ध करण्यात आली नाही. तसेच यामधील व्याजाची झालेली व्याजाची गणना माहिती मागविण्यात आली होती. परंतु, उपलब्ध झाली नाही. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

**3.983 रोखपुस्तक व बँक स्क्रोलनुसार ताळमेळ न घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद नागपूर येथील क्त्ति विभागाचे सन 2016-17 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, खालील तपशिलामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे दिनांक 31/03/2017 अखेर रोखपुस्तीका व बॅक स्क्रोलमधे खालीलप्रमाणे तफावत निदर्शनास आली.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 57 नुसार दरमहाअखेर सामान्य रोखपुस्तकात येणाऱ्या अखेरच्या शिल्लक रक्कमेवर, बॅक पासबुकातील महिना अखेर असणारी शिल्ल्क यांचा ताळमेळ घेणे व त्याची पडताळणी करुन आढळून येणाऱ्या फरकाचे विवरणपत्र तयार करुन त्यामधील चुका दुरुस्त करण्यासाठी बँकेकडे पाठविणे, अधिकृतरित्या दुरुस्तीसह अचूकता दर्शविणे आवश्यक आहे

परंतु वित्त विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांनी अशा प्रकारे लेख्यांचे ताळमेळ घेऊन दर्शविलेल्या रक्कमा अचूक असल्याबाबत तपासणी केली नसल्याचे दिसून आले.

**3.984 Deposite रक्कम परत केल्याबाबतची अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, जिल्हा परिषद नागपूर येथील सन 2016-2017 चे लेखापरिक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले कि केलेल्या बांधकामाबाबतचे (TEST REPORT) deposit रक्कम परत करण्यात आले असुन रक्कम परत करणेसाठी मोजमाप पुस्तका प्रमाणे recovery statement सादर करणे आवश्यक असतांना तसे करण्यात आले नसल्याने किती रक्कम संबंधीताने जमा केले होते, याबाबत खात्री पटत नाही. तरी याबाबत उचित खुलासा करुन तसे अनुपालन सादर करावे.

2) उपरोक्त प्रमाणकाद्वारे संबंधीत कंत्राटदारांना त्यांचे जमा असलेले REFUND OF B.D. deposit रक्कम किंवा (TEST REPORT) deposit रक्कम परत करण्यात आले असुन परत केलेल्या रक्कमे बाबत पावती किंवा चालान नस्ती आढळून आले नाही, तरी पावती किंवा चालान सादर करण्यात यावे.

**3.985 अंतर्गत लेखापरीक्षण पथक स्थापन न करणेबाबत**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त विभाग, जिल्हा परीषद, वर्धा चे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करीत असतांना अंतर्गत लेखापरीक्षण पथक स्थापन करणेबाबत नस्तीची तपासणी केली असता अंर्तगत लेखापरीक्षण पथक स्थापन केल्याचे दिसुन आलेले नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-लेखाप-2015/प्र.क्र. 42/वित्त-6, दिनांक 05/12/2015 अन्वये अंर्तगत लेखापरीक्षण पथक स्थापन करणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने सन 2016-2017 मध्ये अंतर्गत लेखापरीक्षण पथक स्थापन केल्याची कार्यवाही केलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 13 दिनांक 29/11/2017 अन्वये विचारणा केली असता उत्तर देण्यात आले नाही.

**3.986 अफरातफर प्रकारणाची वसुली न होण्याबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** अफरातफर प्रकरणाची नस्ती तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2014/प्रक्र-8/वित्त-5 बांधकाम भवन, मुंबई, दिनांक 18/03/2014 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत यांनी टप्याटप्याने संपुर्ण जिल्हयातील अपहारीत रक्कमांची प्रकरणे निकाली काढावीत. या प्रलंबीत प्रकरणांचा पचांयत समितीनिहाय दरमहा आढावा घ्यावा. प्रत्येक गटविकास अधिकारी तसेच सर्व विस्तार अधिकारी (पंचायत) यांना याबाबत कालबध्द कार्यक्रम आखून घ्यावा. त्यानुसार या प्रकरणी जे अधिकारी काम करणार नाहीत त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2014/प्रक्र-8/वित्त-5 बांधकाम भवन, मुंबई, दिनांक 18/03/2014 नुसार न्यायालयाने स्थगिती दिलेली नसेल तर वसुली थांबविली जाउ नये तरी पण रुपये 19,77,717/- दिनांक 25/10/2017 पर्यंत वसुली अभावी थकीत आहे. तरी सदर रक्कम वसुल करुन योग्य लेखाशिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

3) जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेले विभाग / पंचायत समिती यांच्या सर्व लेख्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांची आहे. जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती स्तरावर व विभाग स्तरावर अशी एकुण 86 प्रकरणापैकी न्यायालयीन प्रकरण वगळता एकुण 83 प्रकरणे प्रलंबीत असुन त्यामध्ये रुपये 19,77,717/- रक्कम गुंतुन पडलेली आहे. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी सदरची रक्कम वसुल करण्यसाठी विशेष नियोजन करणे आवश्यक आहे.

**3.987 अभिकरण शुल्काची कपातीबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने विभागीय स्तरावर तथा पंचायत समिती स्तरावर अभिकरण योजने मधून राबविण्यात आलेल्या योजनेवर झालेल्या एकूण खर्चाच्या 5 टक्के रक्कम ही जिल्हा निधी मध्ये जमा करण्याकरीता मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांना पाठवावयाची आहे, आणि त्यातून जिल्हा परिषद विकासात्मक योजना राबवित असते. वरील तपशिला प्रमाणे योजनेवर झालेला प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी मागणी करून सुध्दा लेखापरीक्षणामध्ये उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे कपात करण्यात आलेली रक्कम ही 5 टक्के पेक्षा कमी किंवा अधिका याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

2) महिला व बालकल्याण विभागामधील प्रकल्प गोंदिया 1, गोंदिया-2, व सालेकसा यांनी 5 टक्के कपात रक्कमेची मागणी करून सुध्दा लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाही व जिल्हा परीषदेचे वित्त विभागास भरणासुध्दा केलेली नाही. तेव्हा संबंधीत प्रकल्पांनी अभिकरण योजनेमधून योजना राबविली किंवा कसे याबाबत दस्ताऐवज सह लेखापरीक्षणाची खातरजमा करून देण्यात यावी.

**3.988 खासदार निधी अंतर्गतचे खातेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद, वित्त विभागाचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण कालावधीत रोखपुस्तकाची तपासणी केली असता वेगवेगळे खासदार निधीचे बँकेत खाते व त्याचे रोखपुस्तकात रक्कम शिल्लक असल्याचे आढळून आले आहे.

वेगवेगळे खासदार महोदय यांचेकडून विकास कामांकरीता प्राप्त निधीचे खाते व रोखपुस्तक जिल्हा परिषद चंद्रपूरचे वित्त विभागाअंतर्गत ठेवण्यात आलेले आहे. सदर खाते अंतर्गतचा व्यवहार उपरोक्त प्रमाणे सन 2011-2012 पासून बंद असून सन 2011-2012 नंतर कोणताही व्यवहार करण्यात आलेला नाही. तथापि, सदर खात्यामध्ये रक्कम रूपये 10,26,710/- (दहा लक्ष सव्वीस हजार सातशे दहा ) शिल्ल्क असल्याचे दिसून येते. सदर प्राप्त निधी अंतर्गत कोणतेही कामे होणार नसल्याने रक्कम अखर्चीत राहील व निशकारण पडून राहील. त्यामुळे सदर खाते व रोखपुस्तक बंद करुन शासन खाती अखर्चित निधी जमा करणे आवश्यक आहे.

**3.989 गुंतवणूकीबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्तप्रमाणे 30 दिवसांकरीता मुदत ठेव अंतर्गत गुंतवणूक करण्याबाबत दिनांक 01/03/2017 ला आदेशित केले, म्हणजेच दिनांक 01/03/2017 ते 31/03/2017 या एका महिन्याच्या मुदत ठेवीच्या गुंतवणूकी करीता आदेशित केले असतांना मात्र सदर गुंतवणूक प्रत्यक्षात दिनांक 09/03/2017 ला करण्यात आली. म्हणजेच 8 दिवस विलंबाने गुंतवणूक केल्याने तेवढे दिवसांचे जिल्हा परिषदेचे व्याजाचे नुकसान झाले आहे. परिगणाना केली असता या 8 दिवसाचे रक्कम रूपये 20,68,412/- जिल्हा परिषदेचे नुकसान झाले आहे.

2) नस्तीतील टिप्प्णीनुसार जिल्हा निधी अंतर्गत रूपये 10,95,00,000/- व हातपंप देखभाल दुरुस्ती अंतर्गत रूपये 38,44,533/- ची मुदत दिनांक 07/06/2016 ला संपुष्टात आल्याने त्याची पुनश्च 180 दिवसांकरीता गुंतवणूक केल्याचे नमूद आहे परंतु, त्याची नोंद गुंतवणूक नोंदवहीला नाही. तसेच गुंतवणूकीबाबतचे आदेश नस्तीला संलग्न नाही.

3) गुंतवणूक नोंदवहीतील सन 2016-2017 अखेरचा गोषवारा मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केला नाही.

**3.990 मुदतबाहय धनादेश रद्द न केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 31(1) नूसार धनादेश चालू राहणार नाही, अशी स्पष्ट तरतूद असतांना सुध्दा खालील लेख्यातील धनादेश देऊन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन सुध्दा सदर धनादेश रोखीकृत झालेले नाहीत.

सर्व धनादेश एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून अरोखीकृत असतांना त रद्द करून रोख पुस्तिकेच्या जमेस घेवून रक्कम शासन अनूदानाची असल्यास संबंधीत लेखाशिर्षात जमा करण्यात यावी सदर धनादेश रद्द न केल्यामूळे शासनाचे रक्कम रूपये 20,87,937/- निधी अकारण गुंतवून पडलेले आहेत.

**3.991 वित्त विभागामार्फत अतंर्गत लेखा परिक्षणा बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक सशाप/1093/प्रक्र.261/93/लेखा परिक्षा, दिनांक 19 जुन 1995 नुसार जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने अतंर्गत लेखा परिक्षण करुन नियमित लेखा परिक्षनाचे वेळी अतंर्गत लेखा परिक्षणामध्ये निष्कर्ष कळविणे आवश्यक आहे.तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक लेखाप-2015/प्र.क्र.42/वित्त-6, दिनांक 05/12/2015 अन्वये महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या अंतर्गत लेख परीक्षणाची प्रभावी अमलबजावणीसाठी अंतर्गत लेखा परीक्षण पथकाची निर्मिती करणे बाबत आदेशित केलेली आहे.

प्रत्येक आर्थीक वर्षात प्रत्येक पंचायत  समीतीची दोन वेळा तपासणी करावयास पाहिजे.

सन 2015-16 मध्ये विभागाकडे कीती तपासण्या प्रंलबित होत्या. सन 2016-17 मध्ये एकूण कीती तपासण्या केल्या याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास दर्शविण्यात आलेला नाही, त्यामुळे प्रलंबीत तपासण्यांची संख्या निदर्शनास आणता आली नाही. जिल्हा परिषद व पचायंत  समिती  लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट 4 मधील तत्वाचे पालन केले किंवा कसे यांचा बोध होत नाही. प्रलंबित तपासण्यांची संख्या निरंक करुन अहवाल लेखा परिक्षणास दर्शविण्यात यावा.

दिनांक 19 जुन 1995 च्या परिपत्रका नुसार सन 2016-17 चे अतंर्गत लेखा परिक्षणाचे निष्कर्षानुसार कार्यवाही करुन अनुपाल्न अहवाल दर्शवावे.

**3.992 निवृत्ती वेतन, सेवाउपदान व APP-9 बाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एपीपी-9 नोंदवहीत मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी निवृत्ती वेतन, सुधारीत निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन पाठविलेले मंजुरी आदेशाप्रमाणे नोंदी घेऊन त्याप्रमाणे निवृत्ती वेतन अदा करणे आवश्यक आहे. तसेच दरमहा देण्यात येणा-या मुळ निवृत्ती वेतन, महागाई वेतन निवृत्ती, वेतन फरकाच्या नोंदी APP-10 मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.  नोंदवहीमध्ये सन 2016-2017 या वित्तीय वर्षामध्ये नोंदी अपुर्ण घेतलेल्या आहेत. त्यामुळे वरिलप्रमाणे देण्यात येणा-या निवृत्ती वेतन योग्य अदा केलेबाबत खात्री करता आली नाही.  एपीपी-9,10 नोंदवही अदयावत करुन पुर्तता दर्शवावी.

2) 20 कर्मचा-यांना निवृत्तीवेतन मंजुर करुन वितरीत करण्यात आलेले आहेत परंतु, त्यांच्या APP-15 उपदान नोंदवहीमध्ये संबधितांना उपदानाची रक्कम प्रदान करणेपुर्वी आदेशात नमुद केलेली रक्कम वसुल करुन प्रदान करणे आवश्यक आहे. अशी वसुल केलेली रक्कम चलनाच्या प्रती सह शासन खाती तसेच संबधित बँक अथवा सोसायटी यांना अदा झाल्याची पोंच पावती लेखापरिक्षणात दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे कपात रक्कमा संबधित संस्थांना प्राप्त झाल्याची खात्री पटत नाही. याबाबत अनुपालन दर्शवावे.

3) श्री.ए.एल.जाधव मयत आरोग्य सेवक यांचे निवृत्ती वेतन प्रदान आदेश क्रमांक 3858 दिनांक 08/12/2016 अन्वये कुटूंब निवृत्ती वेतन रक्कम रूपये 6,610/- मंजुर केलेले आहे. परंतु, संचीकेमध्ये अंतीम वेतन प्रमाणपत्रानुसार मुळ वेतन रक्कम रूपये 10,600/- व ग्रेड पे रक्कम रूपये 2,400/- एकुण रक्कम रूपये 13,000/- दर्शविले असतांना कुटूंब निवृत्ती वेतन मंजुर करतांना मुळ वेतन रक्कम रूपये10,820/- व ग्रेड पे रक्कम रूपये 2,400/- अशी एकुण रक्कम रूपये 13,220/- नुसार कुटूंब निवृत्ती वेतन रक्कम रूपये 6,610/- अदा केले आहे. तफावतीबाबत खुलासा करावा. संबधिताचे सेवा पुस्तक उपलब्ध करावे व कुटूंब निवृत्ती वेतन, मृत्यु नि सेवा उपदान योग्य दिल्याची खात्री पटवावी.

4) श्री.आर.के.डोंगरे सेवा निवृत्त परिचर यांचे निवृत्ती वेतन प्रदान आदेश क्रमांक 3859 दिनांक 09/12/2016 अन्वये निवृत्ती वेतन रक्कम रूपये 5,575/- मंजुर केलेले आहे. परंतु, संचीकेमध्ये अंतीम वेतन प्रमाणपत्रानुसार मुळ वेतन रक्कम रूपये 9,500/- व ग्रेड पे रक्कम रूपये 1,600/- एकुण रक्कम रूपये 11,100/- दर्शविले असतांना निवृत्ती वेतन मंजुर करतांना मुळ वेतन रक्कम रूपये 9,550/- व ग्रेड पे रक्कम रूपये 1,600/- एकुण रक्कम रूपये 11,150/- नुसार रक्कम रूपये 5,575/- अदा केले आहे. तफावतीबाबत खुलासा करावा.

संबधिताचे सेवापुस्तक उपलब्ध करावे व निवृत्ती वेतन मृत्यु नि सेवा उपदान व अंशराशीकरण योग्य दिल्याची खात्री पटवावी.

5) श्रीमती एस.एस.अंभोरे सेवा निवृत्त आरोग्य सहाय्यीका यांचे निवृत्ती वेतन प्रदान आदेश क्रमांक 3866 दिनांक 29/12/2016 अन्वये निवृत्ती वेतन रक्कम रूपये 9,555/- मंजुर केलेले आहे. परंतु, संचीकेमध्ये अंतीम वेतन प्रमाणपत्रानुसार मुळ वेतन रक्कम रूपये 15,380/- व ग्रेड पे रक्कम रूपये 2,800/- एकुण रक्कम रूपये 18,180/- दर्शविले असतांना निवृत्ती वेतन मंजुर करतांना मुळ वेतन रक्कम रूपये 14,910/- व ग्रेड पे रक्कम रूपये 4,200/- एकुण रक्कम रूपये 19,110/- नुसार रक्कम रूपये 9,555/- अदा केले आहे. तफावतीबाबत खुलासा करावा. संबधिताचे सेवा पुस्तक उपलब्ध करावे व निवृत्ती वेतन, मृत्यु नि सेवा उपदान व अंशराशीकरण योग्य दिल्याची खात्री पटवावी.

6) श्री.जी.आर.पांडे स्वेच्छा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक यांचे निवृत्ती वेतन प्रदान आदेश क्रमांक 3893 दिनांक 08/03/2017 अन्वये निवृत्ती वेतन रक्कम रूपये 5,730/- मंजुर केलेले आहे. परंतु, संचीकेमध्ये अंतीम वेतन प्रमाणपत्रानुसार मुळ वेतन रक्कम रूपये 9,560/- व ग्रेड पे रक्कम रूपये 1,900/- एकुण रक्कम रूपये 11,460/- दर्शविले असतांना मृत्यु नि सेवा उपदानासाठी एकुण रक्कम रूपये 11,460/- च्या 62 सहामही सेवेनुसार रक्कम रूपये 1,77,630/- अनुज्ञेय असतांना रक्कम रूपये 1,69,035/- अदा केलेले आहे. तफावतीबाबत खुलासा करावा व तफावतीची रक्कम रूपये 8,595/- अदा करुन अनुपालन लेखापरिक्षणास दर्शवावे.

**3.993 जिल्हा परिषद उपकरातील दायीत्वाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीडचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात जिल्हा परिषद स्वनिधीची रोखपुस्तिका नमुना नंबर 07 ची तपासणी केली असता, त्यामध्ये रक्कम रूपये 25,27,57,105/- दायित्व निर्माण झालेचे निदर्शनास आले.

(यामध्ये पंचायत समिती उपकर व पंचायत समिती वाढीव उपकर, मुद्रांक शुल्क ग्रामपंचायत वाटप करणे, जमीन समानीकरण अनुदान व जमिन महसूल अनुदान ग्रामपंचायत वाटप करणे या लेखाशीर्षातील सन 2014-15, 2015-16 व 2016-17 च्या पुर्वीच्या आर्थिक वर्षाचे दायित्व विचारात घेतलेले नाहीत). याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 अन्वये अनूसूची मध्ये नमूद केलेल्या विषयांवरच वाजवी तरतूद करुन संबंधित विषयातील कामे किंवा विकास परियोजना यांची अंमलबजावणी करणे किंवा सुस्थितीत ठेवणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य आहे. सदर तरतूदी नुसार जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पीय तरतूदीन्वये खर्च करावयाचा आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 100 नुसार तांत्रिक अधिकारी यांनी नमुना नंबर 42 मधील प्रकल्प नोंदवही तयार करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये सक्षम प्रशासकिय मान्येतेपूर्वी अंदाजित खर्चाची निश्चीत माहिती करुन देऊन, त्याची निकड आणि उपयुक्तता, त्याची वित्त व्यवस्था करणेसाठी उपलब्ध साधने विचारात घेणे आवश्यक आहे व जिल्हा निधीतून याव्दारे वित्त व्यवस्था होण्याच्या मर्यादेपलीकडील कोणताही प्रकल्प हाती घेण्यात येणार नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 106 अन्वये एखादे दायित्व परिपक्व होण्यापूर्वी त्याकरीता निधीचे नियत वाटप करण्यात येईल. सक्षम प्राधिकाऱ्याकडून हमी मिळालेली असल्याखेरीज कोणत्याही बांधकामाच्या संबंधात कोणतेही दायित्व पत्करण्यात येणार नाही. जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पीय मंजूर तरतूद रकमेपेक्षा जादा दायित्व निर्माण करुन जादा खर्च केल्यामुळे सदरची स्थिती उदभवली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 (5) प्रमाणे मागासवर्गीय कल्याणार्थ खर्च केला पाहिजे. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1093/सीआर/1265/34, दिनांक 09/12/1993 अनुसार मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी 20% खर्च करणे अनिवार्य

आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मुंबई शासन निर्णय शासन निर्णय क्रमांक - झेडपीए - 10/2001/प्र.क्र.206/05, दिनांक 06/11/2001 अन्वये शासनाने महिलांच्या विकासा संदर्भात धोरण जाहिर केलेले असून सदर धोरणाप्रमाणे 10% रक्कम महिला व बालकांशी संबंधित कार्यक्रमावर खर्च करणे बाबत सूचित केलेले आहे. पर्यायाने मागासवर्गीय व महिला बाल कल्याणावरील करावयाच्या खर्चाचा अनुशेष भरुन काढणे ऐवजी अनुशेष वाढविणेत आलेला आहे. त्यामुळे मागासवर्गीय ग्रामीण लाभार्थी जनता विकासात्मक कामाच्या लाभापासून वंचित राहिली आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 209 व 214 अन्वये जमा ठेवींचे प्रकार निर्देशित केलेले आहेत. नियम 214 अन्वये परिषदेच्या बांधकामांची कंत्राटे पूर्ण करण्यासाठी ठेवलेल्या सुरक्षा अनामती या नियम 219 प्रमाणे तीन वर्षाच्या आतील परतावा योग्य सुरक्षा अनामती रकमा कंत्राटदारांना परत करणे क्रमप्राप्त असतांना, सदरच्या रकमा बांधकाम, लघुपाटबंधारे इत्यादी कामांवर खर्च नोंदविणेत आलेल्या आहेत. नियम 220 नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी ठेवी व आगाऊ रकमा या शीर्षा खाली प्रलंबित रकमा समायोजित करण्याजोग्या रकमा समायोजित करण्यात आल्याचे पहावयाचे आहे. तथापि सुरक्षा अनामतीच्या परतावा योग्य प्रलंबित रकमा अधिकाधिक समायोजित करण्याची कार्यवाही करुन, दायित्वाची पूर्ती होईल याकडे कटाक्ष ठेवणे आवश्यक असतांना, तसे न करता सदर रकमांचा अन्य बाबींवर खर्च नोंदवून दायित्व ओढवून घेतले आहे.

6) जमिन महसूल अनुदान, समानीकरण अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान इत्यादी अनुदानाच्या रकमा पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या हिश्यांच्या त्यांना प्रदान न करता जिल्हा परिषद स्तरावर खर्च नोंदविणेत आलेला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतूदींचे उल्लंघन झालेले आहेच. तदवतच पंचायत समिती व ग्रामपंचायतींस त्यांच्या हिश्याच्या रकमा प्रदान करणेच्या तरतूदींचे उल्लंघन करुन, दायित्व मोठया प्रमाणावर वाढविले आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील परिशिष्ठ चार अन्वये निधीच्या तरतूदीची मर्यादा पालन केलेले नाही. अर्थसंकल्पीय अंदाजात ज्या प्रयोजनासाठी तरतूद केली आहे. त्याच प्रयोजनासाठी खर्च करावयाची आहे. अंदाजपत्रका मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या रकमे पेक्षा अधिक खर्च होत नाही. हे पाहिले पाहिजे. तथापि अर्थसंकल्पीय तरतूदी व प्रत्यक्ष खर्च संनियंत्रीत न करता तरतुदीपेक्षा जास्त खर्च करण्यात आलेला आहे. खर्चाच्या मंजूरीची लेखापरीक्षा करतांना मार्गदर्शक तत्वांचे पालन करणेत आलेले नाही मंजूरीच्या लेखापरीक्षेच्या योग्य कसोटयांकडे दुर्लक्ष करणेत आलेले आहे. जिल्हा परिषदेच्या वित्तीय हितसंबंधांकडे निष्ठेने लक्ष देणे हे अंतर्गत लेखापरीक्षेचे उदिदष्ट आहे. तथापि स्वनिधीतून करावयाच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यात येणाऱ्या सामान्य तत्वांचे पालन करणेत आलेले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 (4) जिल्हा परिषदेने, स्थानिक साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त ऊपयोग करुन जिल्हयाचा योजनाबध्द विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्या प्रयोजनासाठी पंचायत समितीने आधीच तयार केलेल्या योजना लक्षात घेऊन वार्षिक व दीर्घ मुदतीच्या योजना तयार केल्या पाहिजेत. परंतु सदर तरतूदीचे उल्लंघन करुन उलटपक्षी पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील त्यांच्या हिश्याच्या रकमा जिल्हा परिषदेने खर्च केलेल्या आहेत.

9) अर्थसंकल्पीय तरतुदींचे व वित्तीय औचित्यांचे उल्लंघन करुन अनियंत्रीतपणे खर्च नोंदविलेला असल्यामुळे रुपये 25,27,57,107/- एवढे मोठया प्रमाणावर दायित्व निर्माण झाले आहे. अर्थसंकल्पीय तरतुदींच्या आधारे यथायोग्य अर्थसंकल्प तयार करुन दायित्व कमी करणे आवश्यक असताना, पुन्हा वेगवेगळया लेखाशीर्षांतर्गत खर्च केलेला आहे.

**3.994 रोख पुस्तक शिल्लक रक्कमेचा बँक शिल्लक रक्कमेशी ताळमेळ न घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीडचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात निधीच्या रोखवही व बँक शिल्लकेत तफावत दिसुन येते. यावरुन

निधी फीच्या शिल्लकांचा बँक शिल्लकेशी मेळ घालून तफावतीचे निराकरण केले नसल्याचे स्पष्ट होते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम 31 (1) नुसार धनादेश दिल्यानंतर सहा महिन्यापेक्षा अधिक काळ धनादेश चालू राहणार नाही व तसे धनादेश काढणाऱ्या अधिकाऱ्याने दिनांकित स्वाक्षरीसह केल्याखेरीज तो मुळ दिनांकापासुन एक वर्षापर्यंत विधीग्राहय राहील. तद्नंतर तो रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 31 (2) नुसार रद्द धनादेश नियम संबंधीत महसूल शिर्षाखाली जमेस घेण्यात येइल निधीची रोखवही तपासणीत 30 नोव्हेंबर 2015 रोजी एक वर्षावरील असंवितरीत धनादेश असल्याचे दिसुन आले.

3) जिल्हा निधी मध्ये रोख पुस्तकातिल शिल्लक 2,51,77,08,278/- असुन बँक स्क्रोल प्रमाणे शिल्ल्क रुपये 1,67,31,47,023/- ठेवी मध्ये रुपये 43,91,28,345/-, रुपये 19,98,00,000/- व रुपये 10,00,00,000/- असे आहेत. बँक स्क्रोल व ठेवी यांची बेरीज 2,23,20,75,369/- इतकी येते. यामधुन रोखवहीतील शिल्लक रुपये 2,51,77,08,278/- वजा केल्यास रुपये 28,56,32,909/- इतका फ़रक येतो. परंतु रोखवहीच्या गोषवाऱ्यामध्ये रुपये 1,95,08,24,581/- इतका फ़रक दर्शविला आहे आणि न वटलेल्या धनादेशाच्या रक्कमेची बेरीज रुपये 88,83,70,874/- व निव्वळ फ़रक रुपये 85,91,672/- इतका दर्शविला आहे, त्यामुळे रोखवही व बँक शिल्लक आणि तफ़ावत याचा योग्य ताळमेळ घेतलेला दिसुन येत नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक तेविआ-2014/ प्र.क्र45 / वित्त 4, दिनांक 16/02/2017 नुसार 13 वा वित्त आयोगाचा निधी दिनांक 31/03/2017 पर्यंत 100% खर्च करावा असे निर्देश असताना दिनांक 31/03/2017 अखेर सदर खात्यावर रक्कम रुपये 52,46,427/- इतकी रक्कम रोखवहीप्रमाणे शिल्लक आढळुन आली.

5) 12 वा वित्त आयोग संपुष्टात येवून 13 वा वित्त आयोगास खर्च करण्यास दिनांक 31/03/2017 पर्यंतची परवानगी संपुनही 12 वा वित्त आयोगाच्या खात्यावर अखर्चित रक्कम रुपये 2,54,448/- शिल्लक असल्याचे आढळुन आले.

6) न वटलेले धनादेश पुढील महिन्यात अग्रेषित न करणे, कमी रक्कमेने अग्रेषित करणे-मागील महिन्यातील न वटलेले धनादेश महिन्यात वटलेले नसल्या मुळे ते पुढील महिन्याच्या न वटलेल्या धनादेशाच्या यादीत घेणे आवश्यक असताना. ते प्रलंबीत यादीत नमूद केलेले नाहीत. त्यामुळे न वटलेल्या धनादेशाच्या रकमेत वाढ झाली.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 57 नुसार उक्त कोष्ठकात नमुद केलेल्या रोखवहीतील शिल्लक रकमांचा बँकेतील शिल्लक असलेल्या रक्कमांशी ताळमेळ घालून तफावतीचे सत्वर निराकरण करण्यात येईल. परंतु वरील कोष्ठकात नमुद केलेल्या रोखवहयांतील रक्कमांध्ये असलेल्या तफावतीवरुन अशी कार्यवाही पुर्ण केली नसल्याचे स्पष्ट होते.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 63 मधील नमुन्यात महिना संपल्यास शिल्लक रक्कमांचा गोषवारा काढून बँक ताळमेळ लिहीला गेला नाही. उदाहरणार्थ माहे जानेवारी 2016 व मार्च 2017.

9) सन 2016-2017 मधील ट्रान्झीट रकमांचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

10) डीसीसी मध्ये 214,89,82,597/- रुपये एवढा निधी पडुन आहे. जिल्हा परिषद ने सध्या एस.बी.एच. खात्यातुन व्यवहार केलेला आहे. परंतु डी.सी.सी. मध्ये अडकलेला निधी पुन्हा प्राप्त करुन घेण्यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही, तसेच या कालावधीमधील सर्व व्यवहार बंद केले असतानाही जिल्हा परीषदेमध्ये या खात्यात रुपये 69,000/- जमा केलेले आहे.

11) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 57 अन्वये दर महिन्याचे अखेरचे दिवशी रोखवहीतील शिल्लक व बँकेतील शिल्लक याचा ताळमेळ घेवून फरकाचे विवरण तयार करून येणारा फरक काढुन टाकण्यासाठी सत्वर प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असताना वित्त विभागाने उपरोक्त बँक व

रोखवही फरका बाबत उपाययोजना केलेली नाही. उपरोक्त रोखवहया मध्ये फरकाची रक्कम मोठया प्रमाणात असल्यामुळे सदर रकमे ध्ये अपहारासारखे गंभीर प्रकरणे उदभवु नयेत त्या करीता लेखासंहिता नियम 57 प्रमाणे ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

12) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 57 प्रमाणे बँकेतील शिल्लक व रोखवहीतील शिल्लक यांच्यातील येणारा फरक स्पष्टपणे काढण्याच्या सुचना आहेत. तसेच तीन महिन्यापेक्षा अधिक काळ न वटविण्यात आलेले धनादेश वैयक्तीक मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे निर्दशनास आणण्याबाबत सुचना आहेत. परंतु अशी कार्यवाही केली नाही.

13) न वटलेले धनादेशाबाबत महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 33 (2) नुसार वर्ष संपल्यानंतर धनादेश रद्द करुन सदरील रकमा जमा बाजुस घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

14) वित्त विभागाचे सन 2016-2017 चे लेखा परिक्षणात 31/3/2017 अखेर अरोखीकृत धनादेशाच्या यादीची पडताळणी केली असता एक वर्षावरील असतांनाही महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 31(1)(2) नुसार सदर धनादेश रदद करुन जमेस घेण्यात आलेले नाहीत. सबब एक वर्षावरील न वटविलेल्या धनादेशांची जमा नोंद घेणे आवश्यक ठरते.

15) धनादेश पुन्हा जमेस न घेतल्यामुळे व ताळमेळ न घेतल्यामुळे बँक पासबुक व रोखपुस्तीका या मधील फरकात वाढ होत आहे. काही ठिकाणी फरक उणे दर्शविले आहेत. सदर बाब नियमबाहय आहे. त्यामुळे अपहारासारख्या घटना घडण्यास वाव मिळत आहे किंवा शक्यता नाकारता येत नाही.

**3.995 जिल्हा परिषदेने विविध निधीतुन केलेल्या गुंतवणुकीबाबत**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीडचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या तपशीलानुसार जिल्हा परीषदेने गुंतवणुक केलेली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद स्वनिधीचे डी.सी.सी. बँकेतील गुंतवणुकीवर सन 2011-12 ते सन 2016-17 पर्यंत कोणतेही व्याज प्राप्त झालेले नाही. तरीही तेथेच मुदत ठेवी ठेवण्यात आल्या आहेत.

2) जिल्हा परिषद स्वनिधीचे एसबीएच बँकेतील गुंतवणुकीवर सन 2014-15 ते सन 2016-17 पर्यंत कोणतेही व्याज प्राप्त झालेले नाही.

3) अभिकरण योजनांच्या रकमांची डि.सी.सी. बँकेतील गुंतवणूकीवर सन 2012-13 वगळता सन 2011-12 ते 2016-17 या वर्षातील रकमांवर कोणतेही व्याज मिळालेले नाही.

4) अभिकरण योजनांच्या रकमांची एस.बी.एच. बँकेतील गुंतवणूकीवर सन 2014-15 ते सन 2016-17 पर्यंत कोणतेही व्याज प्राप्त झालेले नाही.

उपरोक्त 01 ते 04 अभिप्राय वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या विवरणपत्रांवरुन देण्यात येत आहेत. गुंतवणुकीवर यापुर्वीही विविध परिच्छेद घेण्यात आलेले आहेत. उदाहरणार्थ विशेष लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 20, 21, 22, 23 तसेच सन 2014-15 चे लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 20, 21, 28, 34, 35 सदर आक्षेप कायम आहेत.

5) वित्त विभागाने नमुना नंबर 84 ठेवलेली आहे. परंतु त्यातील सर्व रकाने भरण्यात आलेले नाहीत. तसेच यातील नोंदी प्रमाणीत करण्यात आलेल्या नाहीत व मिळणारे व्याज कोठे जमा होत आहे याची खात्री केलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 222 प्रमाणे वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी गुंतवणूकीची नोंद ही नमुना नंबर 84 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. उक्त नोंदवहीत परिषदेच्या मालकीच्या सर्व गुंतवणुकी कोणत्या प्रयोजनासाठी प्रत्येक रक्कम धारण करण्यात आली ते त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या स्तंभात नमुद करण्यात येईल आणि प्रत्येक बाबीसमोर सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश नमुद

करण्यात येईल. तथापि असे कोणतेही आदेश वित्त विभागाने नमुद केलेले नाहीत. तसेच गुंतवणुकीच्या एकुण रकमांची पडताळणी दरवर्षी करणे आवश्यक असताना वार्षीक पडताळणी एकदाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 223 नुसार उक्त नोंदवहीत व्याज दर्शविण्यात येईल. वर्षाअखेरीस व्याजाची देय वसुल झालेली व शिल्लक रक्कम दर्शविणारा गोषवारा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी नमुद करावयास पाहिजे परंतु वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी अशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 224 नुसार प्रत्येक सहा महिन्यांनंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी राष्ट्रीय बचत पत्रे, सरकारी वचनपत्रे व ऋणपत्रे यांचे गुंतवणुकीच्या नोंदवहीशी पडताळणी करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केलेली नाही

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 109 (3क) (तीन) नुसार निधीच्या गुंतवणुकीची व्यवस्था व विनिमय करण्यास स्थायी समिती सक्षम असल्याने प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवावयास पाहिजे. परंतु यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही

**3.996 नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंकेत रक्कमा गुंतुन पडलेबाबत**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** वित्त विभाग, जिल्हा परीषद, नांदेडचे सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड मध्ये वित्त विभाग, जिल्हा परीषद नांदेडच्या असलेल्या विविध निधीच्या खात्याच्या रक्कमा सदर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंकेत रक्कम रूपये 31,95,41,656/- पडुन आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभागाचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात सन 2016-2017 या आर्थीक वर्षामध्ये उपरोक्त बँक खात्यात शिल्लक दिनांक 31/03/2005 पासुन पडुन असलेल्या रक्कमा प्राप्त करुन घेण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची संचिका पडताळणी केली असता वित्त विभागाच्या सदर रक्कमा निष्कारण गुंतुन पडलेल्या आहेत. रक्कम प्राप्त करुन घेण्याऐवजी सदर बैंकेतील असलेल्या अल्प मुदत ठेवीची मुदत वाढवुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु, बँक खात्यामध्ये गुंतुत पडलेल्या रक्कमावरील व्याजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उक्त रक्कमा शक्य तितके लवकर वसुल करुन घेणे परीषदेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 57 नुसार सामान्य रोखवही नमुना नंबर 07 मधील अखेरची शिल्लक आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बँक स्क्रोलमधील अखेरची शिल्लक यांचा ताळमेळ घेवुन तफावत शोधुन काढणे व सदर रक्कमेचा गैरवापर टाळण्याच्या उदेशाने रक्कमा वसुल करुन स्टेट बँक ऑफ इंडीया खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे.

**3.997 घसारा निधीबाबत**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** जिल्हा परिषद उस्मानाबाद सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद उस्मानाबादच्या घसारा निधी मध्ये सन 2016-2017 या वर्षाअखेर रुपये 30,14,286/- शिल्लक आहेत.

1) सुरुवातीची शिल्लक - रुपये 1,85,640/-

2) जमा निधी - रुपये 86,50,900/-

3) व्याज जमा - रुपये 1,21,529/-

एकूण जमा - रुपये 89,58,069/-

4) खर्च वजा - रुपये 59,43,783/-

5) अखेर शिल्लक - रुपये 30,14.286/-

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 241 प्रमाणे इमारत किंमतीच्या दर्जाप्रमाणे 2.5% व यंत्रसामुग्री किंमतीच्या 7.5% व इतर बाबीबाबत ठरवून दिलेल्या दराप्रमाणे घसारा निधी परिगणना करून तेवढी रक्कम घसारा निधीत प्रत्येक वर्षी जमा करणे आवश्यक असताना सन 2016-2017 मध्ये अशी कार्यवाही न करता 86,50,900/- रुपये घसारा निधीत जमा केलेले आहेत.

2) घसारा निधीची प्रत्येक वर्षी मालमत्ता निहाय जमा व खर्च नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे घसारा निधीत किती रक्कम भरणा करणे बाकी आहे. याची खात्री करता आली नाही.

3) घसारा निधीतील शिल्लक मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करून घसारा निधीचे उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे.

**3.998 प्रलंबित अग्रीमाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, लातूर सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात नमुना 79 प्रलंबित अग्रीम नोदंवहीची तपासणी केली असता व उपलब्ध करुन दिलेल्या गोषवारा विवरणपत्रा नुसार अग्रीम रकमांचे समायोजन होणे बाकी असल्याचे आढळून आले. दिनाक 31/03/2017 अखेर प्रलंबित आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 220 अन्वये 31 मार्च रोजी संपणाऱ्या वर्षाच्या अखेरीस एक वर्षापेक्षा जुन्या व प्रलंबित असलेल्या रकमांच्या बाबी, त्या प्रलंबित राहिल्याचे तपशिलवार कारणे दर्शविणारे मागील वर्षाचे विवरणपत्र तयार करुन ते दरवर्षी सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांना पाठविणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 210(ब) नुसार इतर स्वरुपाच्या अगाऊ रकमा क्वचित प्रकरणातच देण्यात येतील. या आगाऊ रकमा विभाग प्रमुखांच्या मंजुरीने देता येतील. मात्र उक्त रक्कम 1,000/- रुपयापेक्षा अधिक नसावी व पूर्वीच्या कोणत्याही आगाऊ रकमांचे समायोजन व्हावयाचे राहिलेले नसावे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.-522 / वित्त-9, दिनांक 10 डिसेंबर 2010 व लेखासंहिता नियम 212 नुसार योग्य ते अभिलेखे व रजिस्टर्स ठेवणे व विशेष योजनाबध्द माहिमेचे आयोजन करून सदर अग्रीमे वसुल करावीत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक होते. परंतु या परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे पालन करणेबाबतची कार्यवाही केलेली नाही. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे.

4) अग्रीम नोदंवही नमुना नंबर 79 मधील वेतन अग्रीमांचे प्रलंबित रकमा रकाना क्रमांक 36 मध्ये नमुद केलेल्या नाहीत व वेतन अग्रीम नोदंवहीत वर्ष निहाय शिल्लक रकमेचा गोषवारा काढलेला नाही.

5) अग्रीमाचे समायोजन बऱ्याच वर्षापासून न झाल्याने जिल्हा परिषदेचा निधी अडकून पडलेला आहे. अग्रीमनिहाय पूर्ण पडताळणी करून गैरव्यवहार होत नसल्याची खात्री करावी असमायोजीत रक्कमांची वसूली त्वरीत करून अनुपालन दर्शवावे.